**Shikshan Sanshodhan : Journal of Arts, Humanities and Social Sciences** ISSN: 2581-6241 Volume - 4, Issue - 11, Nov - 2021
Monthly, Peer-Reviewed, Refereed, Indexed Journal Impact Factor: 5.146
Received on : 12/11/2021 Accepted on : 26/11/2021 Publication Date: 30/11/2021

# श्री दत्तात्रेय आणि चार संप्रदाय

**रूपा गजानन बसोले**
Research scholar, Department of Marathi
Osmania University, Hyderabad, Telangana State, India
Email – rupali.S.dixit21@gmail.com

***Abstract:*** श्री दत्तात्रेय हे गुरू-संस्थेचे आदर्श आहेत. महाराष्ट्रातील सर्वच भक्तिसंप्रदायात गुरूचे स्थान श्रेष्ठ असल्यामुळे गुरूतत्वाचा आदर्श असलेल्या श्री दत्तात्रेयांविषयीचा भक्तिभाव सर्व संप्रदायात कमी-अधिक प्रमाणात दिसून येतो. सर्व संप्रदाय हे 'गुरू संप्रदाय' असून उत्कट भक्ती हे त्यांचे प्राणतत्व आहे. त्यामुळे ह्या सर्व संप्रदायातील साधकांच्य भावविश्वात दत्तात्रेयान्ना ही स्थान मिळाले.

***Key words:*** श्री दत्तात्रेय, दत्त संप्रदाय, गुरू-संस्था, श्रीपाद श्रीवल्लभ, नृसिंह सरस्वती, नाथ संप्रदाय, महानुभाव संप्रदाय, वारकरी संप्रदाय, समर्थ संप्रदाय

## 1. प्रास्ताविक:

चौदाव्या शतकात महाराष्ट्राच्या धरतीवर एक वैशिष्ट्यपूर्ण संप्रदाय उदयास आला तो 'दत्त संप्रदाय' होय. श्री दत्तात्रेय ही भारतीय संस्कृतीच्या विकासातील एक अद्भूत निर्मिती आहे. दत्त संप्रदायातीक आराधनेचे केंद्र असलेली प्रमुख विभूती 'श्री दतात्रेय'. दत्तोपासना अतिप्राचीन असली तरी महाराष्ट्रात चौदाव्या शतकात श्री नृसिंह सरस्वतींच्या अवतार कार्यातून तीला सांप्रदायिक महत्त्व प्राप्त झाले. 'तेराव्या शतकापासूनच महाराष्ट्रात आवेगाने वाहू लागलेल्या भक्ति सरितेला येऊन मिळालेला दत्त संप्रदाय हा चौदाव्या शतकातला एक वैशिष्ट्यपूर्ण प्रवाह आहे."१

चौदाव्या शतकाच्या महाराष्ट्राच्या सांस्कृतिक व धार्मिक जीवनाचा संघर्षाचा कालखंड होता. भारतात मुसलमानी सत्तेची मुळे फोफावत होती. महाराष्ट्रातही याहून वेगळी परिस्थिती नव्हती. महाराष्ट्रातही मुसलमान आपले अधिराज्य स्थापन करत होते. मुसलमानी राजवटीत हिंदू प्रजेची कत्तल, सक्तीने धर्मांतर, देवालय आणि मुर्तींचा विध्वंस, स्त्रियांची विटंबना, असे पाशवी अत्याचार चालले होते. मुसलमानी आक्रमणासोबतच सूफी संत-साधूचे आक्रमण अधिक प्रभावी झाले होते. राजाश्रयाखाली वावरणाऱ्या सूफींनी धर्मप्रसाराचे कार्य जोरात चालवले होते. देव-धर्माच्या ही क्षेत्रात आरजकता माजली होती. अनेक हिंदू पीराला भजू लागले होते, दाबल मलिकाला नवस करू लागले होते. समाजाचे सांस्कृतिक, बैद्धिक, नेतृत्व करणारे ब्राह्मण स्वधर्माभिमान सोडून राज्यकर्त्यांची चाकरी करण्यात धन्यता मानत होते. अशा संघर्षमय आणि धार्मिक, सांस्कृतिक दृष्ट्या अवनतीच्या काळात 'श्रीपाद श्रीवल्लभ' आणि 'नृसिंह सरस्वती' ह्या दोन महापुरूषांचा अवतार झाला."२ अशा परिस्थितीत श्री नृसिंह सरस्वतींनी वैदिक परंपरेच्या पुनरूजीवनासाठी व संरक्षणासाठी वर्णाश्रम धर्माला प्राधान्य दिले."३ श्रीपाद श्रीवल्लभ आणि नृसिंह सरस्वती यांच्या अवतार कार्यामुळे आणि दत्तोपसकांच्या दत्तभक्ती मुळे दत्तोपासना आज घरोघरी पोहचली आहे.

## 2. विश्लेषण

गुरू-संस्थेचा आदर्श असलेले दत्तात्रेय हेच या संप्रदायाचे दैवत आहे. परमार्थात गुरू-संस्थेचे महत्त्व अपार आहे.त्याचमुळे सर्व साधन प्रणालीत गुरू-संस्थेला प्राधान्य असलेल्या दत्तात्रयाची पूज्यता रूढ झाली. परमार्थाच्या मार्गात सद्गुरूची नितांत आवश्यकता असते. सद्गुरू अज्ञानरूपी अंधकार दूर सारून ज्ञानाचा प्रकाश दाखवून आत्मज्ञान देतात. "दत्तात्रेय हा परमगुरू

असल्यामुळे पथप्रदर्शक गुरू आणि गुरूच्या मार्गदर्शनाने होणारे परमप्राप्ती हे दोन्ही विशेष त्याच्या स्वरूपात सामावले आहेत."४ महाराष्ट्रातील सर्वच भक्ती संप्रदायांत गुरूचे स्थान सर्वश्रेष्ठ असल्यामुळे गुरूतत्त्वाचा आदर्श असलेल्या श्री दत्तात्रेयांविषयींचा भक्तिभाव सर्व संप्रदायात दिसून येतो.

नाथ संप्रदाय - नाथ संप्रदायात श्री दत्तात्रेयांचे स्थान विशेष आहे. "परम प्राप्तीसाठी योग साधनेचा स्वीकार आणि गुरू-संस्थेची महनीयता ही दत्त स्वरूपातील दोन मोठी वैशिष्ट्ये नाथ संप्रदायाच्या सिद्धांतात व साधनेत अनुस्यूत आहेत."५ श्री दत्तात्रेय हे 'अवधूत योगी आहेत तर नाथ संप्रदाय हा 'अवधूत पंथ'. याच ठिकाणी श्री दत्तात्रेयांचे आणि नाथ संप्रदायाचे आत्मिक संबंध जुळून येतात. 'अवधूतगीत' दत्तात्रेयांनीच गोरक्षनाथांना सांगितल्याची कथा सर्वश्रुत आहे. श्री दत्तात्रेय प्रभू हे अनेक नाथांचे गुरू असल्याचे आढळून येते. नाथ संप्रदायातील बहुतेक सर्व नाथांना आदिनाथ. मत्स्येंद्रनाथ, गोरक्षनाथ, इ. दिक्षा प्राप्त झाली तर काहिंना प्रत्यक्ष श्री दत्तात्रेयांनी ज्ञान देऊन नाथ संप्रदायात सामिल करून घेतले. म्हणूनच नाथ संप्रदायातील नाथांच्या मनात श्री दत्तात्रेयांविषयीचा भाव हा अनन्य साधारण आहे. दत्तात्रेय ही योगसिद्धी प्राप्त करून देणारी देवता अवघूतावस्थेचा आणि गुरू-संस्थेचा आदर्श म्हणून नाथ संप्रदायिकांना पूज्य आहे."६

महानुभाव संप्रदाय – महानुभाव संप्रदायाचे प्रवर्तक श्री चक्रधर स्वामी यांची गुरू परंपरा दत्तात्रेय – चांगदेव राऊळ – गुंडम राउळ – चक्रधर अशी आहे. या परंपरेनुसार महानुभाव संप्रदाय हा दत्त संप्रदायच आहे. "या मार्गासी श्री दत्तात्रेय – प्रभू आदिकारण ' असे स्वतः श्री चक्रधर स्वामी सांगतात. महानुभाव संप्रदायात श्री दत्तात्रेयांना अनन्य साधारण स्थान आहे. महानुभाव संप्रदाय हा 'पंचकृष्णां' ना मानतो. श्री दत्तात्रेय प्रभू हे महानुभाव संप्रदायातील दुसरे पंचकृष्ण होय.

महानुभावाच्या श्री दत्तात्रेयांचे स्वरूप हे श्री नृसिंह सरस्वतींच्या दत्त संप्रदायातील श्री दत्तात्रेया पेक्षा वेगळे आहे. महानुभवियांचे दत्तात्रेय प्रभू हे 'तिन शिरे सहा हात' धारण करणारे श्री दत्तात्रेय तर त्यांचा दत्तात्रेय हा एकमुखी व चतुर्भुज आहे. त्यांचा अवतार विष्णु वा देवतात्रयाचा अवतार नाही, कारण महानुभाव तत्त्वज्ञानानुसार देवता ह्या गौण मानल्या गेल्या आहेत. म्हणूनच दत्तात्रेयांचा अवतार हा चारी युगांत आहे असे मानतात. महानुभावियांच्या दृष्टीने श्री दत्तात्रेयांनी गर्भीचा अवतार स्वीकारून परावशक्तीचा स्वीकार केलेला आहे. त्यांची वाणी अमृत वर्षाव करणारी तर त्यांचे दर्शन अमोघ आहे. महानुभावांच्या इतर अवतारा पेक्षा दत्तात्रेयांचा अवतार विलक्षण आहे. तो सदैव अदृश्य रूपात असतो, नाना रूपे धारण करून अधिकारी जीवांना दर्शन देतो. श्री चक्रधर स्वामींचे परमगुरू चांगदेव राऊळ यांना श्री दत्तात्रेय प्रभूंनी व्याघ्ररूपात दर्शन देऊन शक्ती प्रदान केली होती. महानुभावियांनी श्री दत्तात्रेयांच्या लिला ही ग्रंथीत केल्या आहेत. अशी ही महानुभावांची दत्तभक्ती अनन्य साधारण आहे.

वारकरी संप्रदाय – मराठी भक्ति परंपरेतील एक उदार आणि उदात्त प्रवाह असलेल्या वारकरी संप्रदायात समन्वयाचे प्रतीक असलेल्या श्री दत्तात्रेय प्रभूविषयी पूज्यभाव आहे आणि वारकरी संप्रदायात गुरूला महत्त्व आहे त्यामुळे सहाजिकच गुरू-संस्थेचे आदर्श असलेले श्री दत्तात्रेय पूज्यनीय आहेत. वारकरी संप्रदायाचे प्रणेते संत ज्ञानेश्वर हे गुरू परंपरेने नाथ संप्रदायिक होते आणि नाथ संप्रदायाच्या भावविश्वात श्री दत्तात्रेय प्रभूंचे महत्त्व अनन्य साधारण आहे. म्हणून वारकरी संप्रदायाला दत्त माहात्म्याचा वारसा नाथ संप्रदायाकडून लाभला.

भागवत धर्माचे खांब मानले गेलेले श्री एकनाथ महाराज हे गुरू परंपरेने दत्त सांप्रदायिक होते. त्यामुळे नाथांच्या मनात श्री दत्तात्रेयांविषयी श्रद्धाभाव होता. "नाथांना गुरू कृपेने 'सुलभ' पर्वतावर सगुण साक्षात्कार झाला व ज्ञान दीपिकेच्या उल्ल्वल तेजात सर्व भेदाभेद मावळून ते अंतर्बाह्य दत्तमय होऊन गेले."७ एकनाथांनी दत्तात्रेयांवर 'दत्त मानस पूजा' व ' दत्त महिमा' अशी अभंग रचना करून आपल्या मनातील दत्तात्रेयांविषयीचा भक्तीभाव प्रकट केला आहे. तुकाराम महाराज ही आपल्या

अभंगातून 'तुझी अवघूत मुर्ती माझ्या जीवाची विश्रांती' असे दत्तात्रेयांविषयी भावपूर्ण शब्दांत सांगतात. अशा प्रकारे वारकरी संप्रदायात श्री दत्तात्रेयांचे स्थान पूजनीय आहे.

समर्थ संप्रदाय - समर्थ संप्रदायात श्री दत्तात्रेया प्रती आदरभाव आहे. समर्थांनी आणि त्यांचे शिष्य दिनकर स्वामींनी दत्तातत्रेयांना उपात्य देवता न मानता गुरू स्वरूप सिद्ध पुरुष मानले आहे. समर्थांना सुद्धा दत्तात्रेयांनी एकनाथाप्रमाणेच मलंग वेशात दर्शन दिल्याची कथा समर्थांच्या चरित्रातून आढळते. "दासबोध रचनेसाठी वापरलेल्या संदर्भ ग्रंथांची जी यादी दासबोधाच्या पहिल्या दशकातील पहिल्याच समासात समर्थांनी दिली आहे, तीत दत्तप्रणीत अवधूतगीतेचा आणि गुरूगीतेचा समावेश आहे."८ दिनकर स्वामींनी ही आपल्या 'स्वानुभवदिनकर' या ग्रंथात अवधूगीतेचा संदर्भ ग्रंथ म्हणून आदर केला आहे. समर्थांचे परम शिष्य कल्याण स्वामींनी आपल्या एका पदातून दत्तात्रेयांच्या स्वरूपाचे, संचाराचे आणि सर्व प्रियतेचे भक्तिपूर्ण वर्णन केले आहे. याशिवाय संप्रदायातील अनेक संत-महंतांनी दत्तात्रेयांविषयीचा उत्कट भक्तिभाव आपल्या वाङमयातून प्रकट केलेला आढळतो.

### 3. समारोप:

श्री दत्तात्रेय हे गुरू-संस्थेचे आदर्श आहेत. महाराष्ट्रातील सर्वच भक्तिसंप्रदायात गुरूचे स्थान श्रेष्ठ असल्यामुळे गुरुतत्वाचा आदर्श असलेल्या श्री दत्तात्रेयांविषयीचा भक्तिभाव सर्व संप्रदायात कमी-अधिक प्रमाणात दिसून येतो. सर्व संप्रदाय हे 'गुरू संप्रदाय' असून उत्कट भक्ती हे त्यांचे प्राणतत्व आहे. त्यामुळे ह्या सर्व संप्रदायातील साधकांच्य भावविश्वात दत्तात्रेयाम्ना ही स्थान मिळाले.

**संदर्भसूची:**

१. गोसावी र. रा., 'पाच भक्ति संप्रदाय', प्रतिमा प्रकाशन, तृ. आवृत्ती, पृ. क्र. २४५.
२. तत्रैव, पृ. क्र. २५६.
३. ढेरे रा. चिं., 'दत्त संप्रदायाचा इतिहास', पद्मगंधा प्रकाशन, पृ. क्र. १६३.
४. तत्रैव, पृ. क्र. १६४.
५. तत्रैव, पृ. क्र. ५०
६. गोसावी र. रा., 'पाच भक्ति संप्रदाय', प्रतिमा प्रकाशन, तृ. आवृत्ती, पृ. क्र. २७५.
७. तुळपुळे शं. गो., 'पांच संतकवि', व्हीनस प्रकाशन, द्वि. आवृत्ती, पृ. क्र. १९६.
८. ढेरे रा. चिं., 'दत्त संप्रदायाचा इतिहास', पद्मगंधा प्रकाशन, द्वि. आवृत्ती, पृ. क्र. ६२.